Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 03 December 2024

Time 11.00 to 11.05 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक: ०३ डिसेंबर २०२४ सकाळी ११.०० वाजता.**

****

आंतरराष्ट्रीय दिव्यांग व्यक्ती दिनानिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज दिव्यांग व्यक्तींच्या सक्षमीकरणासाठी राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करणार आहेत. यावेळी एकूण २२ व्यक्ती आणि ११ संस्थांना गौरवण्यात येणार आहे. सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्री डॉ. वीरेंद्र कुमार यांच्या हस्ते दिव्यांग व्यक्तींच्या सक्षमीकरणासाठी अनेक कल्याणकारी उपक्रमांचा शुभारंभ यावेळी करण्यात येणार आहे. यामध्ये ब्रेल लिपीतल्या पुस्तकांच्या पोर्टलसह अनेक महत्वाच्या उपक्रमांचा समावेश आहे.

****

दिव्यांग व्यक्तींना अडथळामुक्त सुलभ जीवन जगता यावं, यासाठी केंद्र सरकारनं सुरु केलेल्या सुगम्य भारत, सुलभ भारत अभियानाला आज नऊ वर्षं पूर्ण झाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिव्यांग लोकांचा स्वाभिमान वाढवण्यासाठी २०१५ मध्ये 'दिव्यांग' शब्द वापरण्यास सुरुवात करण्याचं आवाहन केलं होतं. 'सुगम्य भारत अभियान' आणि 'एक देश, एक सांकेतिक भाषा' यांसारख्या पावलांमुळे दिव्यांगांच्या जीवनात बदल घडून आला आहे. आता त्यांना समान संधी, शिक्षण आणि रोजगार मिळत आहेत.

****

देशाचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांची आज जयंती. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राजेंद्र प्रसाद यांना अभिवादन केलं आहे. संविधान सभेचे अध्यक्ष म्हणून राजेंद्र प्रसाद यांनी भारतीय लोकशाहीचा मजबूत पाया रचण्यात अमूल्य योगदान दिलं, असं पंतप्रधानांनी समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

****

उपराष्ट्रपती जगदीप धनखड आज मुंबई दौऱ्यावर असून, केंद्रीय कापूस तंत्रज्ञान संशोधन संस्थेच्या शतकमहोत्सवी समारंभाला ते प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित

राहणार आहेत. यावेळी उपराष्ट्रपतींच्या हस्ते शतकमहोत्सवी स्तंभाचं उद्घाटन होईल. संस्थेच्या शतकमहोत्सवी वर्षाचं औचित्य साधून 'अमृतकाळात कापसावरची उत्पादनानंतरची प्रक्रिया' या विषयावरच्या परिसंवादाचं आयोजनही करण्यात आलं आहे.

****

आंतरराष्ट्रीय उद्योग क्षेत्रात विविध पातळ्यांवर गुंतागुंतीची परिस्थिती निर्माण होत असून, त्यावर जागतिक पातळीवरच्या भागीदारीची गरज आहे, असं परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस जयशंकर यांनी म्हटलं आहे. कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्रीज तर्फे काल नवी दिल्लीत आयोजित भागीदारीविषयक परिषदेत ते बोलत होते. जागतिक पुरवठा साखळी, नवोन्मेष, आणि तंत्रज्ञान या क्षेत्रात भारत जगाचं नेतृत्व करेल, असा विश्वास व्यक्त करुन जयशंकर यांनी, जगभरात पसरलेल्या भारतीय समुदायाच्या योगदानाचा गौरव केला.

****

राज्यात झालेल्या चांगल्या पावसामुळे गतवर्षीपेक्षा रब्बी हंगामातील पेरणीच्या क्षेत्रात सुमारे दीडपटीने वाढ झाली आहे. ज्वारी, गहू, मकाच्या पेरणी क्षेत्राच्या वाढीबरोबरच यंदा तेलबियांच्या पेरणीचं क्षेत्र वाढलं आहे. त्यामुळे या रब्बी हंगामात, आधीच्या सरासरी ५४ लाख हेक्टर क्षेत्रावरून या वर्षी सरासरी ६० लाख हेक्टरवर पेरण्या होण्याचा अंदाज कृषी विभागाने व्यक्त केला आहे.

****

रब्बी हंगामातील पिकांसाठीही एक रुपयात पीक विमा उपलब्ध करून देण्यात आला आहे. पीक विमा काढण्यासाठी १५ डिसेंबर ही अंतिम मुदत असून, राज्यात आतापर्यंत १८ लाख ७९ हजार ८२२ अर्ज आले आहेत. यातून १३ लाख ३७ हजार ३३६ हेक्टरवरील पिकांचं क्षेत्र विमा संरक्षित झालं आहे. परभणी जिल्ह्यातून सर्वाधिक, दोन लाख ७४ हजार अर्ज आले आहेत. पुणे विभागातून दोन लाख ४२ हजार ५९७ तर ठाणे आणि पालघर जिल्ह्यातून एकही अर्ज आला नसल्याचं, कृषी विभागाच्या आकडेवारीवरून स्पष्ट झालं आहे.

****

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या शिवशाही बसेस बंद करण्याचा अद्याप विचार नाही, असा खुलासा महामंडळानं केला आहे. एसटी महामंडळाकडे सध्या ७९२ वातानुकूलित शिवशाही गाड्या असून, त्यांच्यात कोणताही तांत्रिक दोष नाही,

अशी माहिती महामंडळानं आपल्या संदेशात दिली आहे. शिवशाही गाड्या बंद करण्याच्या माध्यमांमधल्या चर्चेनंतर एसटी महामंडळानं हे स्पष्टीकरण दिलं आहे.

****

गडचिरोली जिल्ह्यात काल भामरागड दलमची सदस्य असलेल्या एका नक्षल महिलेनं पोलिस आणि केंद्रीय राखीव दलासमोर आत्मसमर्पण केलं. आठ चकमकी, तीन खून आणि एका दरोड्याच्या गुन्ह्यात तिचा सहभाग होता. राज्य शासनानं तिच्यावर दोन लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केलं होते. गडचिरोली जिल्ह्यात कालपासून सुरु झालेल्या नक्षलवाद्यांच्या पीएलजीए सप्ताहात पोलिसांच्या चोख बंदोबस्तामुळे दिवसभरात कोणतीही अनुचित घटना घडली नाही, अशी माहिती पोलिस अधीक्षक नीलोत्पल यांनी दिली.

****

जागतिक बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेत भारतीय ग्रँडमास्टर डी. गुकेश आणि चीनचा डिंग लिरेन यांच्यातला आणखी एक सामना अनिर्णित राहिला. सलग तिसरा सामना बरोबरीत सुटल्यानं अंतिम फेरीत लिरेन आणि गुकेश यांचे प्रत्येकी ३ गुण झाले आहेत. दोन्ही खेळाडूंना अजूनही विजेतेपदासाठी प्रत्येकी साडेचार गुणांची आवश्यकता आहे. लिरेननं सलामीचा गेम जिंकला तर गुकेशनं तिसऱ्या गेममध्ये विजय मिळवला होता.

****